Maharashtra State
Board of Secondary & Higher Secondary Education
S.R. No. 832 A, Final Plot No. 178, 179,
Bhamburda, Shivajinagar, Pune- 411 004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्वे नंबर-८३२ अे,फायनल प्लॉट नं.१७८ व१७९
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४.

Phone No.: 020-25705000 E-mail:- secretary.stateboard@gmail. Fax No.: 020-25665807

क्र.रा.मं/संशोधन/६६७६
पुणे - ४११ ००४
दिनांक- १५/१२/२०१८

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय :-** कौशल्य सेतू अभियानमधील व्यवसाय अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणेबाबतच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत.

**संदर्भः-** १) शासन निर्णय क्रमांकःसंकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३५/एसडी-२ दि.२७/०९/२०१८
२) क्र.रा.मं./संशोधन/५४४१,दिनांक-१७/१०/२०१८
३) क्र.रा.मं/संशोधन/६६७० दि.१७/१२/२०१८

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय क्र.२ च्या पत्रान्वये, शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ पूर्वी कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना इ. १० वी प्रमाणपत्र परीक्षेकरिता ट्रान्सफर ऑफ क्रेडिटसूचा लाभ देण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीची माहिती देण्यात आली होती.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ वर्षापासून कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना इयत्ता १०वी प्रमाणपत्र परीक्षेकरिता ट्रान्सफर ऑफ क्रेडिटसूचा लाभ देण्याबाबतचा विषय दिनांक १७/११/२०१८ रोजी झालेल्या महविचार समिती व परीक्षा समिती सभेपुढे सादर करण्यात आला होता. सदर सक्षम समित्यांच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यासाठी खालीलप्रमाणे सहपत्रे पाठविण्यात येत आहेत.

१. तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्था स्तरावरील प्रथम मान्यतेसाठीचा अर्ज नमुना.

२. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित कौशल्य सेतू अभ्यासक्रम तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्था यांना राज्यमंडळाची मान्यता/सांकेतांकासाठी व पुढील प्रक्रियेसाठी कार्यवाही करणेकरिता सूचना व टप्पे.

तरी सदर शासन निर्णयानुसार उपरोक्त पुढील कार्यवाही करण्यात यावी. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना संदर्भिय पत्र क्र.३ अन्वये कळविण्यात आले आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

उपरोक्तनुसार आपल्या विभागीय मंडळाच्या अधिनस्त सर्व माध्यमिक शाळांना आपल्या स्तरावरून सूचित करावे. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४.

# तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्था स्तरावरील प्रथम मान्यतेसाठीचा अर्ज

नमुना - एक

(विनियम २८/१ पहा)शासन निर्णय क्र.-- दि --

तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्था प्रथम मान्यतेसाठी ........... विभागीय मंडळाकडे करावयाच्या अर्जाचा नमुना

क्रमांक :

दिनांक :

प्रति,

मा. विभागीय सचिव,

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

............... विभागीय मंडळ, ...............

विषय - मंडळ प्रथम मान्यता व मंडळ सांकेतिक क्रमांक मिळण्याबाबत.

महोदय,

मी प्राचार्य, ........................................ शैक्षणिक वर्ष ...... पासून, खालील नमूद केलेल्या कौशल्य सेतू अभ्यासक्रमासाठी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) समकक्षतेसाठी मंडळ प्रथम मान्यता व मंडळ सांकेतिक क्रमांक (एस.एस.सी.बोर्डाचा) मिळण्यासाठी याद्वारे अर्ज करीत आहे.

मंडळ विनियम व शासन निर्णय क्र. दिनांक अन्वये आवश्यक असलेला तपशील पुढीलप्रमाणे आहे. मार्च २०१९ मध्ये घेतल्या जाणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एस.एस.सी.) परीक्षेसाठी/समकक्षतेसाठी प्रथमच या संस्थेचे उमेदवार पाठविण्यात येतील.

१. तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्थेचे नाव, ..............................
२. पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता व संपर्क दूरध्वनी क्रमांक .................................... ..............................................................
३. ई मेल आय.डी. ..................................................................

(१) मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम याखालील व्यवस्थापनाचे नाव व त्याचा नोंदणी क्रमांक (खाजगी व्यवस्थापनाच्या तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्थेकरिता) ................................................ ..........................................

(२) संस्था अध्यक्ष/सचिवाचे नाव, पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता व संपर्क (दूरध्वनी/भ्रमणध्वनी)क्रमांक (खाजगी व्यवस्थापनाच्या तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्थेकरिता)
..........................................................................................

(३) तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्था स्थापना/मान्यता शासन निर्णय क्रमांक ..................
व दिनांक ..................

(४) तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्थेच्या प्राचार्यांचे नाव ..........................................
संपर्क(दूरध्वनी/भ्रमणध्वनी)क्रमांक ..........................................
ई मेल आय डी. ..........................................

४. तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्थेतील कौशल्य सेतू अभ्यासक्रमांचा तपशील व म.रा.तं.शि.मं. मुंबई यांचा संलग्नता क्रमांक

| अ.क्र. | कौशल्य सेतू अभ्यासक्रमाचे नाव | एकूण विद्यार्थी प्रवेश क्षमता | शेरा |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| ५. | | | |

१. ज्या माध्यमातून कौशल्य सेतू अभ्यासक्रमाचे शिक्षण देण्यात येते/द्यावयाचे ते/त्या शिक्षणाचे/ची माध्यम/माध्यमे: ..........

२. (१) वर्गात तरतूद केलेली एकूण आसनव्यवस्था आणि प्रत्येक कौशल्य सेतू अभ्यासक्रमाच्या बॅच मधील विद्यार्थ्यांची संख्या :

| अ.क्र. | कौशल्य सेतू अभ्यासक्रमाचे नाव | बेंचेस् (संख्या) | एकूण विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता | वर्ग खोलीचे माप चौ.मी. | वर्ग खोल्यांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |
| ५. | | | | | | |

(२) प्रात्यक्षिकांसाठी एका वेळी एका शिक्षकास नेमून दिलेली विद्यार्थ्यांची कमाल संख्याः ...
(३) प्रात्यक्षिकांसाठी तरतूद केलेल्या प्रयोगशाळेची विद्यार्थीसंख्या क्षमता : . . . . . . . . . .

४. तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्थेच्या इमारतीचा व भौतिक सुविधांचा तपशील (फक्त कौशल्य सेतू अभ्यासक्रमासाठी निश्चित केलेल्या भौतिक सुविधांचा तपशील द्यावा)-
(१) संस्थेची इमारत स्वतःच्या मालकीची/भाडेतत्वावर-
(२) वर्ग खोल्यांची एकूण संख्या-
(३) संस्थेभोवती कंपाऊंड वॉल/तारेचे कुंपण आहे/नाही-
(४) संस्थेत उपलब्ध असलेल्या ड्युएल डेस्कसची संख्या-
(५) विद्यार्थी/विद्यार्थीनीसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था आहे/नाही-
(६) पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेचा तपशील-
(७) जनरेटर सुस्थितीत आहे/नाही, नसल्यास पर्यायी व्यवस्था-
(८) अग्निशामक यंत्र आहे/नाही-
(९) विद्युत व्यवस्था/विद्युत जोडणी - विद्युत साहित्य आहे/नाही-
(१०)संगणक संच - एकूण संख्या-
(११)क्रीडांगण आहे/नाही . . . . .असल्यास मोजमापे . . . . . . . आणि क्षेत्रफळ-
(१२)स्वतंत्र ग्रंथालय आहे/नाही . . . . . . . ग्रंथांची संख्या -

५. तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्थेची आर्थिक स्थिती (खाजगी व्यवस्थापनाच्या संस्थेकरिता)-
शैक्षणिक वर्ष २० . . . . या शैक्षणिक वर्षासाठी उत्पन्नाची साधने व रक्कम

| उत्पन्न | खर्च |
|---|---|
| प्रशिक्षण शुल्क रु.. . . . . . | निदेशक वर्ग - रु. . . . . . |
| इतर साधने रु. . . . . . . . | शिक्षकेतर कर्मचारी वर्ग रु. . . . . |
| | आकस्मिक खर्च रु. . . . . . . . |
| | साधनसामग्री रु. . . . . . . |

६.विद्यार्थ्यांकडून आकारलेले शुल्काचे दर
(१) कौशल्य सेतू अभ्यासक्रमनिहाय शुल्काचे दर :
१.
२.
३.
४.

विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या शैक्षणिक सवलतींसाठी, कोणतीही तरतूद असल्यास -

..................................................

(२) तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्था निधीतून सामाजिक स्तरानुसार विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सवलतींचा/विद्यावेतनाचा लाभ मिळणारे विद्यार्थी -

(अ) विद्यार्थी संख्या -

(ब) प्रतिविद्यार्थी सवलत/विद्यावेतन दर -

(क) एकूण रक्कम रुपये -

महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे विनियम, १९७७/शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३५/एस.डी.-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८ मध्ये विहित केलेल्या मान्यतेच्या व अनुषंगीक सर्व शर्ती पाळण्याचे आम्ही याद्वारे वचन देतो.

आपला विश्वासू,

प्राचार्य,
तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्था स्वाक्षरी
नाव - ....................
शिक्का

सहपत्रे -

१. संस्था स्थापना/मान्यता शासन निर्णय प्रत

२. म.रा.तं.शि.मं., मुंबई च्या संलग्नता प्रमाणपत्राची प्रत

टीप - सदर प्रपत्रात प्रस्ताव तीन प्रतीत तयार करावा.

## उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद यांचे अभिप्राय

प्राचार्य, (तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्था) ...................... ..................

यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा/समकक्षतेसाठी मंडळ प्रथम मान्यता व मंडळ सांकेतिक क्रमांक मिळण्याकरिता विहित नमुन्यात सादर केलेल्या प्रस्तावास शिफारस करण्यात येत आहे/नाही.

उपसचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,
विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद
(स्वाक्षरी व शिक्का)

******

**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नीत कौशल्य सेतू अभ्यासक्रम राबविणाऱ्या तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्था यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची मान्यता/सांकेतिक क्रमांकासाठी व पुढील प्रक्रीयेसाठी शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेकरिता सूचना व टप्पे –**

१. प्रत्येक कौशल्य सेतू अभ्यासक्रम राबविणाऱ्या तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्था यांनी इयत्ता १० वी साठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची मान्यता व सांकेतिक क्रमांक घेणेसाठी प्राचार्यांनी/संस्था प्रमुखांनी/समन्वयकांनी स्वतंत्रपणे विहित नमुन्यातील अर्ज **उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद यांच्या** शिफारशीसह संबंधित विभागीय मंडळाकडे (एस.एस.सी.बोर्डाकडे) तीन प्रतीत सादर करावा. सदर अर्जासोबत सहपत्रात नमूद केलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती जोडाव्यात.

२. सदर अर्ज/प्रस्ताव कार्यरत कौशल्य सेतू अभ्यासक्रम राबविणाऱ्या तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्था यांनी क्रमांक १ प्रमाणे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेल्या तारखेपर्यंत सादर करावा व कौशल्य सेतू अभ्यासक्रम नव्याने सुरू करणाऱ्या तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्था यांनी सदर संस्था/केंद्र यामध्ये कौशल्य सेतू अभ्यासक्रम सुरु झाल्याच्या शैक्षणिक वर्षाच्या (प्रवेश सत्र) दिनांक ३० सप्टेंबर पर्यंत सादर करणे आवश्यक राहिल. सदर दिनांकापर्यंत मंडळाने विहीत केलेले शुल्क आकारुन याबाबत कार्यवाही केली जाईल. तद्नंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावासाठी मंडळाने निर्धारित केलेला दंड आकारुन प्रस्तावांबाबत कार्यवाही करण्यात येईल.

३. सदर प्रस्तावासाठी (एस.एस.सी.बोर्डाने) मंडळाने निर्धारित केलेले शुल्क/दंड पुढीलप्रमाणे असेल

| अ.क्र. | प्रस्ताव प्राप्त झाल्याचा तपशील | शुल्क (रुपये) |
|---|---|---|
| १. | विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या प्रस्तावांसाठी नियमित शुल्क | १०००/- |
| २. | विहीत मुदतीनंतर पहिल्या तीन महिन्यात प्राप्त झालेल्या प्रस्तावांसाठी दंड | ५००/- (१०००+५००) |
| ३. | तद्नंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांसाठी प्रतिमाह दंड | १००/- (१५००+१०० दरमहा) |

४. उपरोक्तप्रमाणे मंडळ मान्यता (एस.एस.सी.बोर्डाची) प्रथमतः तात्पुरत्या स्वरुपात एक वर्षासाठी देण्यात येईल. सदर मंडळ मान्यता पुढील पाच वर्षाच्या कालावधीत प्रत्येक वेळी एक वर्षासाठी वर्धित करण्यात येईल. मान्यता वर्धित करण्यासाठी प्रतिवर्षी रु.१०००/- शुल्क आकारण्यात येईल. तद्नंतर सहा वर्षानंतर (१+५ वर्षानंतर) निर्धारित सर्व अटी शर्तींची पूर्तता होत असल्यास

रु.२०००/- एकवट शुल्क आकारुन तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्था यांना कायम मंडळ मान्यता (एस.एस.सी.बोर्डाची) देण्यात येईल.

५. मंडळाचे (एस.एस.सी.बोर्डाचे) विभागीय कार्यालयांचे अधिनस्त जिल्हे व मंडळ मान्यतेसाठी अर्ज शिफारशीसह पाठविणाऱ्या संबंधित उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद यांचा तपशील पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | एस.एस.सी.बोर्डाच्या विभागीय मंडळाचे नाव | अधिनस्त जिल्हे | मंडळ मान्यतेसाठी अर्ज शिफारशीसह पाठविण्यासाठी प्राधिकृत अधिकारी |
|---|---|---|---|
| १. | पुणे | पुणे, सोलापूर | उपसचिव, म.रा.तं.शि.मं., वि.का. पुणे |
| | | अहमदनगर | उपसचिव, म.रा.तं.शि.मं., वि.का. औरंगाबाद |
| २. | नागपूर | नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, वर्धा | उपसचिव, म.रा.तं.शि.मं., वि.का. नागपूर |
| ३. | औरंगाबाद | औरंगाबाद, बीड, परभणी, जालना, हिंगोली | उपसचिव, म.रा.तं.शि.मं., वि.का. औरंगाबाद |
| ४ | मुंबई | बृन्हमुंबई, ठाणे, पालघर, रायगड | उपसचिव, म.रा.तं.शि.मं., वि.का. मुंबई |
| ५ | कोल्हापूर | कोल्हापूर, सांगली, सातारा | उपसचिव, म.रा.तं.शि.मं., वि.का. पुणे |
| ६ | अमरावती | अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम, बुलढाणा | उपसचिव, म.रा.तं.शि.मं., वि.का. नागपूर |
| ७ | नाशिक | नाशिक, जळगाव, धुळे, नंदूरबार | उपसचिव, म.रा.तं.शि.मं., वि.का. औरंगाबाद |
| ८ | लातूर | लातूर, नांदेड, उस्मानाबाद | उपसचिव, म.रा.तं.शि.मं., वि.का. औरंगाबाद |
| ९ | कोकण | रत्नागिरी, सिंधुदुर्ग | उपसचिव, म.रा.तं.शि.मं., वि.का. मुंबई |

६. उपरोक्तप्रमाणे मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक (एस.एस.सी.बोर्डाची) प्राप्त झालेल्या तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्था यामधून कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थीच मंडळाच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी किंवा/व ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस्सह समकक्षता प्राप्त करुन गुणपत्रक व प्रमाणपत्र मिळविण्यासाठी पात्र असतील.

७. अशा नोंदणीकृत तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्थांना मंडळाकडे प्रतिवर्षी प्रत्यक्ष नोंदणी होणाऱ्या संख्येनुसार नोंदणी शुल्क दिनांक ३० सप्टेंबर अखेर भरणे आवश्यक आहे. नोंदणी शुल्काचे दर पुढीलप्रमाणे असतील.

| अ.क्र. | प्रत्यक्ष परीक्षेसाठी/ समकक्षतेसाठी नोंदणी केलेली विद्यार्थी संख्या | नोंदणी शुल्क रुपये (इ.१०वी) |
|---|---|---|
| १ | ०१ ते १०० | १०००/- |
| २ | १०१ आणि त्यापुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यांसाठी | २००/- |
| ३ | १ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर (दंड) | २००/- |
| ४ | तद्नंतर | ५००/- |

८. विद्यार्थी ज्या माध्यमिक शाळेतून यापूर्वी इ.१० वीच्या परीक्षेला प्रविष्ट झालेला आहे त्या शाळेतूनच मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस मिळविण्यासाठी अर्ज करू शकेल व सदर अर्जासोबत इ.१० वी परीक्षेच्या अंतिम गुणपत्रिकेची प्रत व कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या प्रमाणपत्राची प्रत जोडणे/ अपलोड करणे आवश्यक राहील.

९. मंडळाने विहित केलेल्या पध्दतीने (ऑन लाईन/ऑफ लाईन) व विहित केलेल्या मुदतीत तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्थांतील विद्यार्थ्यांनी इ.१० वी परीक्षा/ ट्रान्सफर ऑफ क्रेडिटससह समकक्षतेसाठी आवेदनपत्र पूर्वीच्या शाळेच्या मुख्याध्यापकांमार्फत सादर करणे आवश्यक राहील. सदर आवेदनपत्रातील माहिती वस्तुनिष्ठ असल्याची खातरजमा करूनच मुख्याध्यापकांनी सदर अर्ज मंडळाकडे (एस.एस.सी.बोर्डाकडे) अग्रेषित करणे आवश्यक राहील. सदर अर्जासाठी मंडळाच्या मान्य दराने नियमित/विलंब/अतिविलंब/विशेष अतिविलंब/अति विशेष अतिविलंब शुल्क विद्यार्थ्यांना भरावे लागेल.

१०. विद्यार्थ्याने प्रथम भाषा, द्वितीय/तृतीय भाषा, तसेच अनिवार्य व वैकल्पिक श्रेणी विषय यामध्ये यापूर्वीच्या मंडळाच्या परीक्षेमध्ये सुट प्राप्त केली असल्यास (सदर विषयात उत्तीर्ण झाला असल्यास) आवेदनपत्रामध्ये त्याबाबतचा वस्तुनिष्ठ तपशील गुण/श्रेणी भरावा. सदर तपशील मुख्याध्यापकांनी मूळ कागदपत्रांवरुन तपासून घ्यावा.

११. तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्थेतून कौशल्य सेतू अभ्यासक्रम उत्तीर्ण होवून प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या विद्यार्थ्याला एका कोर्ससाठी दोन ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस् याप्रमाणे मंडळाच्या इ.१० वी च्या परीक्षेतील पुढील एक ते चार विषयांसाठी ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस् घेता येतील.

१. कोणताही एक भाषा विषय
२. गणित
३. विज्ञान व तंत्रज्ञान
४. सामाजिक शास्त्रे

विद्यार्थ्यांचा उपरोक्त अर्जाद्वारे मंडळाकडे (एस.एस.सी.बोर्डाकडे) प्राप्त झालेला डेटा (माहिती) प्रिलिस्टच्या स्वरुपात संबंधित माध्यमिक शाळेकडे सॉफ्ट/हार्ड कॉपीच्या स्वरुपात पाठविण्यात येईल. तो मुख्याध्यापकांनी योग्य असल्याची खातरजमा करुन प्रमाणित करणे आवश्यक राहील व काही दुरुस्ती असल्यास त्या निर्धारित मुदतीत मंडळाकडे (एस.एस.सी.बोर्डाकडे) सादर करावयाच्या आहेत.

१२. या योजनेसाठी मंडळाच्या (एस.एस.सी.बोर्डाच्या) अनिवार्य विषयांच्या परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रवेशपत्रिका (ऑन लाईन/ऑफ लाईन) संबंधित पूर्वीच्या माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांनी सही शिक्क्यासह प्रमाणित करुन त्या वितरीत कराव्यात.

१३. इ.१०वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्याचा एखादा अनिवार्य विषय/श्रेणी विषय राहिलेला असेल तर त्याची परीक्षा त्याने त्याच्या पूर्वीच्या शाळेतून देणे आवश्यक राहील.

१४. प्रचलित शासन निर्णयानुसार इ.१० वी ची समकक्षता प्राप्त करण्यास पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांचा निकाल प्रचलित पध्दतीनुसार जाहीर करण्यात येईल व अशा सर्व विद्यार्थ्यांना त्याच्या पूर्वीच्या माध्यमिक शाळेमार्फत मंडळाच्या विहीत नमुन्यात गुणपत्रिका व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल.

१५. ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस घेवूनही उत्तीर्ण न होऊ शकलेले विद्यार्थी पुनर्परिक्षार्थी म्हणून पुढील परीक्षेस प्रविष्ठ होऊ शकतील.

१६. तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्थेकडून प्राप्त झालेल्या विषयांचे ट्रान्सफर ऑफ क्रेडीटस्/गुण यामध्ये दुरुस्ती असल्यास ती संबंधित संस्थांनी प्रमाणित करून मंडळास (एस.एस.सी.बोर्डास) विहीत मुदतीत कळविल्यास निकालात दुरुस्ती करण्यात येईल.

१७. या विद्यार्थ्यांना मंडळाची श्रेणी सुधार योजना लागू राहणार नाही.

१८. विद्यार्थ्याला कौशल्य सेतू अभ्यासक्रमातील एक किंवा दोन अभ्यासक्रमासाठी (कोर्ससाठी) प्राप्त गुणांचा तपशील/प्रमाणपत्र विद्यार्थ्यांकडे देण्याची जबाबदारी संबंधित अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांची राहील.

१९. संबंधित यंत्रणेने कौशल्य सेतू अभ्यासक्रमामध्ये शिकविल्या जाणा-या मान्य कौशल्य सेतू व्यवसाय विषयांची/विषय गटांची यादी राज्य मंडळाकडे सादर करावी.

२०. उपरोक्तप्रमाणे ट्रान्सफर ऑफ क्रेडीटसचा लाभ घेवून गुणपत्रिका व प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मंडळाने निश्चित केलेले शुल्क भरणे विदयार्थ्यांस अनिवार्य राहील.

२१. उपरोक्तप्रमाणे तरतुदी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून पुढे कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विदयार्थ्यांना लागू होतील.

२२. शैक्षणिक वर्ष २०१८ -१९ पूर्वी कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विदयार्थ्यांना इ.१०वी प्रमाणपत्र परीक्षेकरिता ट्रान्सफर ऑफ क्रेडीटसचा लाभ देणेबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अ. - या विदयार्थ्यांना तरतूदीप्रमाणे एक ते चार विषयांसाठीचे ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस प्राप्त करता येतील.

ब.- इ.१० वी प्रमाणपत्र परीक्षेकरिता ट्रान्सफर ऑफ क्रेडीटसचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या विदयार्थ्यांनी मंडळाने (एस.एस.सी.बोर्डाने) विहीत केलेल्या नमुन्यात अर्ज करून नोंदणी करावी लागेल. सदर

अर्ज सादर करताना अर्जासोबत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या गुणपत्रिकेची (अंतिम) प्रत व कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या प्रमाणपत्राची प्रत जोडणे/अपलोड करणे आवश्यक राहील.

क. - विद्यार्थ्याला कौशल्य सेतू अभ्यासक्रमाच्या एका कोर्ससाठी दोन याप्रमाणे किमान एक व कमाल चार विषयांसाठी क्रेडिटस वापरता येतील.

ड. - कौशल्य सेतू अभ्यासक्रमातील एक किंवा दोन अभ्यासक्रमासाठी प्राप्त प्रमाणपत्र विद्यार्थ्यांकडे देण्याची जबाबदारी संबंधित अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांची राहील.

इ. - याशिवाय सदर विद्यार्थ्यांना प्रचलित शासन निर्णयामधील अनुषंगिक तरतूदी लागू राहतील.

****

Maharashtra State
Board of Secondary & Higher Secondary Education
S.R. No. 832 A, Final Plot No. 178, 179,
Bhamburda, Shivajinagar, Pune- 411 004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्वे नंबर-८३२ अे,फायनल प्लॉट नं.१७८ व १७९
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४.

Phone No.:020- 25705000 E-mail:-secretary.stateboard@gmail.com Fax No.:-020-25665807

क्र.रा.मं/संशोधन/६६७७
पुणे – ४११ ००४
दिनांक- १४/१२/२०१८
१७

प्रति,

मा.संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,.
मुंबई.

**विषय**:–कौशल्य सेतू अभियाना मधील व्यवसाय अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणा–या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणेबाबतच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत..

**संदर्भ**:–१.शासन निर्णय संकीर्ण–२०१८/प्र.क्र.१३५/एसडी–२ दि.२७.९.२०१८
२.विभागीय मंडळांना जा.क्र.रा.मं./संशोधन/५४४१ दि.१७.१०.२०१८ व्दारे दिलेले आदेश व त्याची आपणास दिलेली प्रत
३.विभागीय मंडळांना जा.क्र.रा.मं./संशोधन/६१५४ दि.२६.११.२०१८ व्दारे दिलेले आदेश

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय शासन निर्णयाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पूर्वी कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण करणा–या विद्यार्थ्यांना इ.१०वी प्रमाणपत्र परीक्षेकरिता ट्रान्सफर ऑफ क्रेडिटसूचा लाभ देणेसाठीच्या कार्यवाहीच्या सूचना संदर्भिय पत्र क्र.२ नुसार विभागीय मंडळांना देण्यात आल्या होत्या. त्याची प्रत प्रमुख एनवायसीएस,मुंबई/ जनरल मॅनेजर, यशस्वी ॲकॅडमी फॉर स्किल्स पुणे यांना त्याची देवुन कळविण्यात आले होते की, सर्व लाभार्थी विद्यार्थी पत्रात दिलेल्या सूचनांप्रमाणे ट्रान्सफर ऑफ क्रेडिटसूचा लाभ घेण्यासाठी मंडळाकडे विहित मुदतीत अर्ज करतील हे पहावे.

संदर्भिय पत्र क्र.३ नुसार सदर विद्यार्थ्यांना अर्ज करणेसाठी ३० नोव्हेंबर,२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. प्राप्त अर्जावर पुढील कार्यवाही सुरू आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण करणा–या विद्यार्थ्यांना इ.१०वी प्रमाणपत्र परीक्षेकरिता ट्रान्सफर ऑफ क्रेडिटसूचा लाभ देणेसाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करणेसाठी सदर पत्रासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे आपणकडे पाठविण्यात येत आहेत.

१. दि.२७ सप्टेंबर,२०१८ च्या शासन निर्णयाची प्रत.
२. तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्था स्तरावरील प्रथम मान्यतेसाठीचा अर्ज नमुना.
३. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नित कौशल्य सेतू अभ्यासक्रम राबविणा–या तंत्र

कृमाप

निकेतने/ इतर शैक्षणिक संस्था यांना राज्यमंडळाची मान्यता /सांकेतिक क्रमांकासाठी व पुढील प्रक्रियेसाठी कार्यवाही करणेकरिता सूचना व टप्पे.

उपरोक्त प्रमाणे पाठविण्यात आलेली सर्व कागदपत्रे आपल्या आधिनस्त असलेल्या आपल्याशी संलग्नित असलेल्या कौशल्य सेतू अभ्यासक्रम राबविणा-या तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्था यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव पाठविण्याची कृपया व्यवस्था करावी व त्याप्रमाणे कार्यवाहीबाबत सूचना निर्गमित कराव्यात.

तसेच आपल्याशी संलग्नित तंत्र निकेतने/इतर शैक्षणिक संस्थांची नावे व पत्ते यासह आपण केलेल्या कार्यवाहीच्या प्रतीसह संबंधित विभागीय मंडळ व या कार्यालयास पाठविण्यात यावेत ही विनंती.

आपला विश्वासू,

सचिव,
राज्य मंडळ, पुणे-४.

प्रत माहितीस्तव:-

१. मा.सहसचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई -१ यांना पुढील कार्यवाहीस्तव

क्र.कोविमं/डीपी/वि.मा./ २५८८
दिनांक:- 28 DEC 2018

प्रति,
मुख्याध्यापक,
या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

उपरोक्त क्र.रा.मं./संशोधन/६६७६ दि.१५/१२/२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरुन करावी.

**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी :- लेखा शाखा/ इ.१० वी परीक्षा/इ.१२ वी परीक्षा**